# पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे-४११०१९

## निविदा फॉर्म - प्रपत्र 'अ'

१. सदर कामासठी पिंपरी चिंचवड मनपाचा ई-टेंडरिंग दाखला आवश्यक आहे.

२. निविदाकारांनी निविदेचे दर हे निविदा प्रसिध्द केलेचे कालावधीत असलेले किमान वेतन दर विचारात घेऊन सर्वकरांसह प्रतिसुरक्षा रक्षक प्रतिमाह दर देणे आवश्यक आहे. किमान वेतन दरापेक्षा कमी वेतन दराच्या निविदा अपात्र ठरविणेत येतील.

३. पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे मागणीनुसार पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या मिळकतीचे संरक्षणार्थ २ वर्ष कालावधीसाठी सुरक्षा रक्षक (रिलिव्हर सर्व्हिस व सुपरव्हिजन चार्जेसह) करार पध्दतीने नेमण्यात यावेत.

४. पिंपरी चिंचवड सायन्स पार्क सुरक्षा कामाच्या ठेक्यांतर्गत नेमलेल्या १४ सुरक्षा रक्षक कर्मचारी (पैकी १ पर्यवेक्षकीय कामासह) यांची नेमणुक ही सायन्स पार्कचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाप्रामाणे करावयाची आहे. व प्रत्येक सुरक्षा कर्मचारी त्यास नेमून दिलेल्या कामकाजाच्या जागी हजर राहील याची खातरजमा करून घेणे तसेच नेमलेल्या सुरक्षा कर्मचा-यांच्या गैरहजेरीत नेमणुकीचे ठिकाणी सायन्स पार्कच्या कोणत्याही सामानाची, साहित्याची कोणत्याही प्रकारे चोरी अथवा मालमत्तेची नुकसानी झाल्यास त्याची नुकसान भरपाई द्यावी.

५. सायन्स पार्क यांनी सदर ठेकेदाराकडून प्रस्तुत ठेक्यांतर्गत द्यावयाची मासिक रक्कम ही त्या महिन्यात सायन्स पार्कच्या कोणत्याही वस्तुची अथवा साहित्याची नुकसानी अथवा चोरी झाली नाही याची खातरजमा झाल्यानंतरच देयक देण्यात येईल.

६. ठेकेदाराने सदरी सुरक्षा कामासाठी नेमावयाच्या सुरक्षा कर्मचा-यांना कामगार कायद्यातील तरतूदीप्रमाणे वेतन देण्याचे मान्य केले असून त्या विषयक कायद्यातील सर्व तरतूदी बंधनकारक राहतील. तसेच त्यांना शासनाचा सर्व्हिस टॅक्स व शिक्षण उपकर वेळोवळी शासनाचे मागणीप्रमाणे भरावयाचा आहे. ठेकेदाराने सदरील तरतूदींचे पालन करण्यात कसूर केल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही ठेकेदारावर राहील.

७. ठेकेदाराला सदरील ठेक्यानव्ये देण्यात आलेल्या मासिक रक्कमेशिवाय अन्य कोणताही आकार किंवा जादा खर्च देण्यात येणार नाही. (शासनाचे सर्व्हिस टॅक्स व इतर कर यामध्ये शासनाने केलेले बदल यांस सदर अट लागू राहणार नाही.)

८. ठेकेदाराने सुरक्षा रक्षक कर्मचारी कोठे नेमावयाचे आहेत हे ठरविण्याचे अधिकार सायन्स पार्क, मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील. ठेकेदाराने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करून सदरील ठिकाणे सायन्स पार्क अधिकारी यांचे मतानुसार ठरवुन घ्यावयाची आहेत.



पिंपरी चिंचवड सायन्स पार्कला आवश्यकता भासल्यास लिहून देणार, यांनी जादा सुरक्षा कर्मचारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या लेखी मागणीवरून द्यावयाचे आहेत. जादा सुरक्षा रक्षक कर्मचारी मागणी केल्यास त्यांचे वेतन अदा करतांना या करारनाम्यात मान्य केलेल्या दराप्रमाणे अदा केले जातील व कोणत्याही वेळी तपासणी केली असता वर नमुद केलेल्या संख्येपेक्षा कमी सुरक्षा रक्षक कर्मचारी कामावर असल्याचे आढळयास त्यांच्यासाठी द्यावयाची मोबदल्याची रक्कम एकुण मोबदल्यातून कमी करण्याचा हक्क व अधिकार हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहील.

९. ठेकेदाराने सदरील सुरक्षा व्यवस्थेचे काम पाहण्यासाठी नेमावयाच्या त्यांच्या सुरक्षा कर्मचा-यांना योग्य तो गणवेश, सुरक्षा साधने, विजेची बॅटरी, काठी, शिट्टी इत्यादी स्वखर्चाने पुरविणे. सदरचे सुरक्षा कर्मचारी हे सायन्स पार्कचे मिळकतीचे सुरक्षा व्यवस्थेकामी ठेकेदाराने यांनी तैनात

केले आहेत, हे दर्शविणारा बिल्ला प्रत्येक सुरक्षा कर्मचा-यास देण्यात यावा. तसेच नेमलेले सुरक्षा रक्षक झोपलेले आढळयास प्रति दिन प्रति सुरक्षा रक्षक र.रू. ५०/- दंड व पुर्ण गणवेशात सुरक्षा रक्षक नसल्यास प्रति सुरक्षा रक्षक प्रति दिन र.रू २५/- दंड म्हणुन कपात करणेचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

१०. ठेकेदाराने पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी नेमावयाचे सुरक्षा कर्मचारी हे किमान सुशिक्षित असावेत व त्याची शारिरीक पात्रता ही पुढील प्रमाणे असावी.

१) उंची १६३ सेमी पेक्षा कमी नसावी. २) फुगवून व न फुगवता छातीत ४ ते ५ से.मी चा फरक असावा. ३) वजन व वय १८ ते ४५ च्या प्रमाणास ४५ ते ६५ असावे. ४) दृष्टी चष्म्यासह व चष्म्याशिवाय ६.६ असावी. कलर ब्लाईंड नसावा. ५) धावणे १ कि.मी. अंतरासाठी ६ मिनिटे कमीत कमी वेळात. ६) वैद्यकीय तपासणी प्रमाणात कॅटॅगिरी 'ए' असावी. तसेच आवश्यकतेप्रमाणे व गरजेनुसार बंदूकधारी माजी सैनिकाची नेमणूक शस्त्र साहित्यासह सक्षम अधिकारी सांगतील त्या ठिकाणी नेमावे लागतील, त्यासाठी अधिक किमान वेतन र.रू. ५००/- (र.रू. पाचशे) प्रतिमाह प्रति सुरक्षा रक्षक अदा करणेत येईल.

११. ठेकेदाराने त्याच्या सुरक्षा कर्मचा-यांमार्फत सायन्स पार्कचे मिळकतीचे आवारातील साहित्याची साधनसामुग्रीची सुरक्षा तसेच मालमत्तेची सुरक्षा चोखपणे ठेवणेची असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारे हयगय अगर नुकसान किंवा चोरी होऊ नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तसेच मोकळ्या जागेवर अतिक्रमण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. सायन्स पार्क मिळकती मधील रोख रक्कमेची काळजी घेणे आवश्यक आहे. मिळकतीच्या आतील अथवा बाहेरील मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्यांची भरपाई ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

१२. ठेकेदाराने नेमलेल्या सुरक्षा रक्षक कर्मचा-यांच्या कामकाजावर योग्य ती देखरेख रोजच्या रोज ठेवाववयाची आहे. त्याकामी तिन्ही पाळयांमध्ये कामाची चोख व्यवस्था आहे व सर्व सुरक्षा रक्षक कर्मचारी कामावर आहेत याची पाहणी करावयाची आहे. तसेच गैरहजर असलेल्या सुरक्षा रक्षकांचे ठिकाणी त्वरीत पर्यायी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावयाची आहे. सदर कर्तव्यात हयगय अथवा टाळाटाळ केल्यास त्याचे दरमहाचे बिलामधून ५ टक्के रक्कम सर्व्हिस व



सुपरव्हिजन चार्जेस मधून कपात करण्यात येतील.

१३. प्रस्तुतचे सुरक्षा व्यवस्थेची कामे ठेकेदाराने अन्य कोणत्याही ठेकेदारास पोट ठेक्याने देता येणार नाही . सदरील ठेका हा पोटठेक्याने अन्य इसमास दिल्याचे आढळल्यास सदर ठेका रद्द करण्याचे हक्क व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

१४. या कामाबाबत सायन्स पार्क या ठिकाणचे जबाबदार सक्षम अधिकारी जी आवश्यक कामे सांगतील व ज्या ज्या सूचना देतील त्या ठेकेदारास विनाअट मान्य असले पाहिजे.

१५. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने नेमण्यात येणा-या सुरक्षा कर्मचा-यांना मराठी भाषेचे पुरसे ज्ञान असल्याबद्दची खात्री करणे गरजेचे आहे. सुरक्षा व्यवस्थेसाठी नेमण्यात येणा-या सर्व व्यक्तींना मराठी भाषेत देण्यात येणा-या लेखी अथवा तोंडी सूचना समजने आवश्यक आहे व प्रत्येक नियुक्त करणेत येणा-या सुरक्षा हे वय १८ ते ६० वर्ष वयोगटातील असावेत यांचेवर कोणतेही गैर पोलिस रेकॉर्ड नसावे ते शुध्द चारित्र्याचे असावेत.

१६. ठेकेदार याच्या कर्मचा-यांवर सायन्स पार्कचे अधिकारी /विभाग प्रमुख यांचे संपुर्ण नियंत्रण राहील. ठेकेदार यांच्या सुरक्षा कर्मचा-यांनी सायन्स पार्कचे संबंधित विभागाचे जबाबदार अधिका-याने दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी करावयाची आहे. सुरक्षा रक्षक हे ठरवून दिलेल्या नाक्यावर नसल्यास अथवा गैरवर्तन करताना आढाळल्यास त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील.

१७. ठेकेदाराने संस्थेचे यापुर्वी मान्य केलेले दर त्या अनुषंगाने झालेली सर्व कागदपत्रे व पत्रव्यहार हा कारारनाम्याचा अविभाज्य भाग राहील.

१८. ठेकेदार यांच्याकडून वरीलपैकी कोणत्याही अटीशर्तीचा भंग झाल्यास सदरचा ठेका तातडीने रद्द करून जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष यांना राहील.

१९. मुख्य कार्यकारी अधिकारी व ठेकेदार यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा वाद उदभवला तर लवादाच्या कायद्याच्या तरतुदींच्या अनुषंगाने सोडवला जाईल. याकामी मा. अध्यक्ष तथा मा. आयुक्त. पि.चि. महानगरपालिका यांचा एकपक्षीय लवाद राहील व लवादाचा निर्णय हा उभय पक्षावर बंधनकारक राहील.

२०. निविदा मंजूर निविदाकारास करारनामा करणेपुर्वी ठेकेदार / ठेकेदारी संस्था पिंपरी चिंचवड मनपाचे विद्यमान नगरसेवक, स्विकृत सदस्य व पिंपरी चिंचवड मनपा अथवा पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे अध्यक्ष, संचालक, कर्मचारी यांचेशी नाते संबध नसलेबाबत र.रू. १००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज प्रतिज्ञापत्र सदर करावे लागेल.

२१. नियुक्त सुरक्षा रक्षकास कोणत्याही प्रकारे शारिरीक व्यंग नसावे. त्याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै. वाय. सी.एम.एच. येथील वैद्यकीय अधिक्षक याचे वैद्यकिय प्रमाणपत्र सादर करावे लागेल. याकामी होणारा सर्व खर्च संबंधित संस्था/ एजन्सी/ ठेकेदार यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे. याबाबत पिंपरी चिंचवड सायन्स पार्ककडून कोणताही खर्च अदा केला जाणार नाही.



२२. निविदाकाराचे एजन्सी/संस्थेस कमीत कमी ३ (तीन) वर्षाचा सुरक्षा व्यवस्था केलेल्या कामाचा कामकाज अनुभव असावा. त्याबाबत अनुभव प्रमाणपत्र / दाखला सादर करणे निविदाकारावर बंधनकारक राहील.

२३. निविदाधारकाने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षक कर्मचा-यांच्या कामकाजावर योग्य ती देखरेख ठेवायची आहे. त्यासाठी तीन (१ली, २री, ३री) पाळीमध्ये व जनरल पाळीमध्ये सुरक्षा रक्षक ८(आठ) तास (दिवस किंवा रात्रीच्या वेळी) तैनात करून कामाची चोख व्यवस्था ठेवायची आहे. व ड्युटी चार्टनुसार सर्व सुरक्षा रक्षक कामावर हजर आहेत. तसेच किमान वेतन कायद्यानुसार सुरक्षा रक्षकांना ड्युटी चार्टनुसार साप्ताहिक सुट्टी दिल्याची पहाणी करावयाची आहे. सदर कर्तव्यात निविदाधारकाने ह्यगय केल्यास त्याचे दरमहाचे एकूण बीलाचे रक्कमेवर ५% रक्कम सुपरव्हिजन चार्जेस म्हणून कपात करणेत येतील.

२४. सुरक्षा व्यवस्थेकरीता ठेकेदाराने नेमलेल्या सुरक्षा रक्षकास शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या किमान वेतन कायद्यानुसार वेतन तसेच इतर आवश्यक वित्तलब्धी धनादेशाव्दारे संबंधित सुरक्षा रक्षकांचे बँक खात्यात किंवा (Account Payee Cross Cheque) धनादेशाव्दारे जमा करणे व वेतन चिठ्ठी अदा करणे बंधनकारक राहील. यासाठी निविदाधारकास वेगळा आकार/चार्ज अदा केला जाणार नाही. मंजूर दरानेच सुरक्षा व्यवस्था करावी लागेल.

२५. निविदा कालावधीत शासनाचे आदेशाने किंवा कायद्यातील बदलामुळे निविदाकारास किमान वेतन, जानेवारी, जुलै मध्ये वेळोवेळी लागू होणारा महागाई भत्ता (D.A) विशेष भत्ता, सेवाकराची वाढीव रक्कम द्यावी लागल्यास व अशा वाढीव रक्कमेची निविदाकाराने पुराव्यासह मागणी केल्यास तशी वाढीव रक्कमेची प्रतिपुर्ती करण्याविषयी पिंपरी चिंचवड सायन्स पार्क मार्फत वरिष्ठ स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

२६. नियुक्त केलल्या सुरक्षा रक्षक (स्त्री व पुरुष) कर्मचा-यांवर कोणतेही गैर पोलीस रेकॉर्ड नसावे व ते शुध्द चारित्र्याचे असणे आवश्यक आहे. याबाबत सुरक्षा रक्षक (स्त्री व पुरुष) कर्मचा-यांचा पोलीस पडताळणी / चारित्र्य दाखला (प्रमाणपत्र) सादर करणे संबधित संस्था/ एजन्सी / ठेकेदार यांचेवर बंधनकारक राहील.

२७. निविदाकारांनी आवश्यकतेप्रमाणे व गरजेनुरुप सुरक्षा व्यवस्थेकरिता पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे क्षेत्रात सक्षम अधिकारी सांगतील त्या त्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था २४ तास

(१ली, २री, ३री) या तीन पाळी व जनरल पाळीमध्ये ड्युटी चार्टनुसार सुरक्षा रक्षक (स्त्री व पुरुष) तैनात करावयाची आहे.

२८. निविदाकाराकडे सुरक्षा रक्षकांचा पोलीस पडताळणी दाखला व केंद्र शासनाच्या खाजगी सुरक्षा रक्षक (नियमन) कायदा, २००५ अंतर्गत परवाना असणे आवश्यक आहे.

२९. सुरक्षा व्यवस्थेमध्ये पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या मिळकती, साधनसामुग्री व मालमत्तेची चोरी अथवा नुकसान झालेस त्याची भरपाई नजीकचे देय बीलातून वसुल करणेत येईल.

३०. मंजुर निविदाकारास करारनामा करणेस पाचारण केले असता त्यांना करारनामा करून द्यावा लागेल व मान्य झालेल्या दरानुसार अनामत रक्कम भरावी लागेल. करारनामा करून देणेस



टाळाटाळ अथवा असमर्थता दर्शविलेस भरलेली बयाणा, अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार मा.आयुक्त तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड पुणे- ४११०१९ यांस राहील.

३१. निविदेचा ग्राह्यता कालावधी निविदा उघडलेपासुन १२० दिवसांचा राहील.

३२. निविदा कार्यवाही पुर्ण झालेनंतर व सक्षम अधिकारी यांची खात्री झालेनंतर मंजूर निविदाधारका व्यतिरिक्त अन्य निविदाकारांची भरलेली बयाणा रक्कम अलाहीदा परत करणेत येईल. तसेच निविदेनुसार देणेत आलेला कामाचा हमी कालावधी काम संपलेपासून २ वर्षाचा राहील. सदर हमी कालावधी संपल्यावर व त्या वर्षाचे संक्षम संस्था / शासनाव्दारे लेखापरिक्षण पुर्ण झालेनंतर मान्य निविदाधारकारांची अनामत रक्कम अलाहिदा अदा करणेत येईल.

३३. मान्य निविदाकारचे संबधित ठेकेदार/संस्था/एजन्सी यांचे मुळ मालकाने व ठेकेदार/संस्था /एजन्सी यांचे मार्फत करारनामा करणा-या व्यक्तीने स्वत:चे लगतचे महिन्यातील दोन फोटो, पत्यासह रहाण्याचेबाबत पुरावा (रेशनिंग कार्ड, लाईट बिल, मनपा कराचे बील), स्वत:चे पॅन कार्ड, बॅंक पासबुक, झेरॉक्स इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

३४. निविदा धारकास देण्यात येणा-या आदेशानुसार त्यांनी सुरक्षा रक्षक कर्मचारी वर्ग (स्त्री व पुरुष) यांची २ (दोन) वर्ष कालावधीसाठी नेमणुक करावयाची असून नेमणेत आलेल्या सुरक्षा रक्षक कर्मचा-यांमधूनच डुटी चार्टनुसार (रिलिव्हर व सुपरविजन चार्जेससह) करार पध्दतीने आठवड्यातील ७ दिवसाकरीता ६-१ प्रमाणे सुटटी सोडविणेकरीता रिलिव्हर सुरक्षा रक्षक नेमणे (सुरक्षा रक्षकास साप्ताहिक सुट्टी देणे), सुरक्षा रक्षकांचे रजेचे कालावधीत, गैरहजेरीचे कालावधीत पर्यायी व्यवस्था करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील व सुपरविजन कामी निविदाधारकाने त्यांचे मार्फत स्वतंत्र व्यवस्था करणे बंधनकारक असून त्यासाठी कोणताही जादा आकार (चार्जेस) दिला जाणार नाही. तसेच पुढील महिन्याचा ड्युटी चार्ट माहिन्याचे २५ तारखेपुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी (सायन्स पार्क)/ सुरक्षा अधिकारी यांचेकडे देणे बंधनकारक आहे.

३५. मान्य निविदाकारास कामाचे आदेश देणे पुर्वी पिंपरी चिंचवड सायन्स पार्ककडे तैनात करणेत येणा-या सुरक्षा रक्षक (स्त्री व पुरुष) यांची शारिरीक फिटनेस बाबत तपासणी, धावणे ही चाचणी व प्रशिक्षण सुरक्षा अधिकारी यांचे मार्फत घेणेत येईल. सुरक्षा रक्षकांची वैद्यकीय तपासणी पिंपरी चिंचवड मनपाचे कै. वाय सी. एम. एच येथील वैद्यकीय अधिक्षक यांचेकडून करून घेणेत यावी व वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे. याबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिका अथवा पिंपरी चिंचवड सायन्स पार्ककडून कोणताही आकार अगर जादा चार्जेस (खर्च) दिला जाणार नाही. ठेकेदार यांनी याबाबत होणारा खर्च स्वत: करावयाचा आहे. ड्युटी चार्ट नुसार सुरक्षा व्यवस्थेकामी तैनात केलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतन हे प्रत्यक्ष कामकाज चालू केलेचे दिनांकापासून अदा केले जाईल.

३६.	मंजूर निविदाकाराचा सुरक्षा रक्षक कर्मचारी वर्ग अर्धवट हजर राहिल्यास त्याची पर्यायी व्यवस्था ठेकेदारानेच करणे बंधनकारक राहील . व सुरक्षा रक्षक कर्मचारी गैरहजर अथवा



बैशिस्त वर्तणूक करताना आढळल्यास त्या दिवसाचे वेतन कपात केले जाईल.

३७.	निविदाकारांने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षक (स्त्री व पुरुष) कर्मचा-यांपैकी काही सुरक्षा रक्षक (स्त्री व पुरुष) काम सोडून गेल्यास किंवा गैर वर्तनामुळे सेवेतून कमी केल्यास त्यांची व त्यांचे ऐवजी नेमलेल्या सुरक्षा रक्षक (स्त्री व पुरुष) यांची माहिती अटी शर्तीनुसार सादर करावायाचे कागद पत्रासह मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (सायन्स पार्क) यांना त्याच दिवशी लेखी कळविणे बंधनकारक राहील.

३८.	औद्योगिक विवाद कायदा १९४७ मधील कलम २५ (ब) नुसार एका कॅलेंडर वर्षात मंजूर निवादाकाराने नियुक्त केलेल्या सुरक्षा रक्षक कर्मचा-यांना नियुक्त कामगारांचे २४० दिवस भरणार नाहीत याची दक्षता घेऊन त्यांची नेमणुक सुरक्षा व्यवस्थेकामी करणेत यावी. त्याबाबत काही कायदेशीर बाबी निर्माण झाल्यास त्यास पिंपरी चिंचवड सायन्स पार्क जबाबदार राहणार नाही. सर्व जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील.

३९.	टेडरिंग व्दारे दि. १०/०१/२०१७ ते दि. २५/०१/२०१७ रोजी दुपारी १२ ते ३ या वेळेत स्विकारलेल्या निविदा दि. २७/०१/२०१७ रोजी दुपारी ३.०० ते ५.०० वाजता किंवा प्रसिध्द केलेल्या वेळेमध्ये निविदा कमिटीच्या वेळेनुसार संचालक मंडळ यांचे समोर उघडणेत येतील. निविदा उघडतांना निविदाकार स्वत: अथवा त्यांचा प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

४०.	ज्या निविदाकाराची निविदा मंजूर होईल त्या निविदाकारांस सुरक्षा रक्षक पुरविणेकामी कामाचे आदेश दिलेपासून पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे सुरक्षा व्यवस्थेकामी तैनात करणेत येणा-या सुरक्षा रक्षकांकरीता शासनाकडे सुट घेणेत येऊन पुणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करून ३% किंवा बदल होणा-या दराने लेव्हि शासनाकडे भरणे संबधित निविदाकारास बंधनकारक राहील. निविदेचा (कामाचा) कार्यकाल संपुष्टात आलेनंतर पिंपरी चिंचवड सायन्स पार्ककरीता शासनाकडे नोंदीत केलेल्या सुरक्षा रक्षकांना पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे सेवेत ठेवणेत येणार नाही किंवा अस्थापनेवर रुजू करून घेणेकामी न्यायलयीन दावा/ हक्क दाखल करता येणार नाही.

४१.	नेमणेत येणा-या सुरक्षा रक्षक कर्मचा-यांची संपुर्ण माहिती तपशील (उदा. सुरक्षा रक्षक कर्मचा-यांचा ई.एस.आय. क्रमांक व पी.एफ. क्रमांक) लगतचे महिन्यातील पासपोर्ट आकाराचे दोन रंगीत छायाचित्रासह दोन प्रतित (Bio-Data) सादर करण्यात यावा.

४२.	उद्योग, उर्जा व कामगार विभाग मंत्रालय,मुंबई -४०००३२ दि. १२ नोव्हेंबर २००२ महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ मधील सर्व नियम व तरतूदीचे तसेच शासनाचे किमान वेतन कायदा व यासारखे इतर कायद्यानुसार असणारे नियम, तरतूदीचे त्यात झालेल्या व होणा-या बदलाचे पालन करणे हे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

४३.	निविदा प्रसिध्द केलेल्या कालावधीत असलेल्या किमान वेतन दरापेक्षा कमी दराची निविदा रद्द करणेचा अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड पुणे ४११०१८ यांना राहील.



४४.	शासनाचे सर्व कायद्यानुसार व त्यामध्ये झालेल्या बदलानुसार भराव्या लागणा-या कराचा भरणा शासनाकडे जमा केल्याबाबतचे पुरावे [उदा. सर्व्हिस टॅक्स (सेवा कर व शिक्षण उपकर), भविष्य निर्वाह निधी, कामगार राज्य विमा, व्यवसाय कर, लेव्हि इत्यादी] बीला सोबत सुरक्षा रक्षक कर्मचा-यांचे नाव, कर्मचारी खाते क्रमांक, व विविध विभागाने संबधित सुरक्षा रक्षक कर्मचा-

यास दिलेल्या क्रमांक (उदा. ई.एस.आय. पी. एफ. विमा निधी, आयकर इ.) रकमेसह यादी व विविध खात्याची ज्या संबधित विभागात रकमा जमा केल्या आहेत त्यांची चलने/यादी सादर करावे लागती. ती पिंपरी चिंचवड सायन्स पार्कने अदा केलेल्या रकमेनुसार स्वतंत्र असावीत.

४५. कोणतेही कारण न देता पुर्णत: किंवा अशंत: निविदा मंजुर अथवा नामंजूर करणेचा अधिकार मा. आयुक्त तथा अध्यक्ष पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे ४११०१९ यांनी राखून ठेवला आहे.

४६. सदरच्या ठेक्याच्या अनुषंगाने नेमलेल्या सुरक्षा रक्षक कर्मचा-यांबाबत कोणत्याही प्रकारचा दावा/तक्रार/अपघात, नुकसान भरपाई इत्यादी वाद उध्दभवल्यास त्यास पुर्णपणे ठेकेदार जबाबदार राहातील व याबाबत सायन्स पार्कचा काही एक संबंध राहणार नाही.

४७. सक्षम संस्थेच्या वतीने करण्यात येणा-या लेखा परिक्षणात काही त्रुटी अथवा काही आपेक्ष आढळल्यास त्याची पुर्तता करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

४८. मा. सह. विमासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे परिपत्रकान्वये पिं.चिं.सायन्स पार्क तर्फे देण्यात येणा-या कंत्राटी कामाचा व त्यावर नेमलेल्या कामगांराचा म्हणजेच आपले सुरक्षा रक्षक कर्मचारी यांचा कामागार नुकसान भरपाई विमा निधीकडे उतरविणे निविदाधारकावर बंधनकारक राहील. त्याबाबत सुरक्षा रक्षक कर्मचा-यांचे नाव व रक्कमेसह सविस्तर यादी सादर करावी.

४९. शासनाचे वेळोवळी लागू होणारे नियम, अटी, शर्ती हे ठेकेदारास बंधनकारक राहतील.

५०. मुळ निविदेच्या अटी व शर्ती या करारनाम्याचा अविभाज्य भाग राहील.

उपरोक्त अटीशर्ती निविदाधारकास बंधन कारक राहतील. त्यामुळे उपरोक्त अटी पैकी कोणत्याही अटी व शर्ती व कायद्यातील तरतूदींचा भंग केल्यास निविदा/ठेका रद्द केला जाईल.

स्थळ प्रतिवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असे.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड सायन्स पार्क
चिंचवड पुणे -१९

वरीलप्रमाणे सर्व अटी, शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला/ आम्हाला मान्य आहे./ आहेत. व त्या माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील/राहतील. त्याबाबत मी/आम्ही खालील स्वाक्षरी / स्वाक्ष-या केली/केल्या आहे/आहेत.

शिक्का

ठेकेदाराची सही -
नाव व पत्ता -
जाहिरात क्रमांक -
क्र. सायन्स पार्क - ०१/२०१६-१७
दिनांक - / /२०१